झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/ ९८४८ /२०२४
दिनांक २८/११/२०२४

## झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद फा.प्लॉट क्र.४३०, प्लॉट क्र.४५, (स.नं.५४४/अ) गुलटेकडी, डायस प्लॉट, पुणे या झोपडपट्टी अंदाजे क्षेत्रफळ ९८०.७६ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर क्षेत्र' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र पुणे महानगरपालिकेची सदर क्षेत्राचे विकसन हक्क झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नेमलेल्या विकसकाने प्राप्त केले आहेत; आणि

ज्याअर्थी,सदरची झोपडपट्टी पुनर्वसन योजना जा.क्र.डी.पी.ओ./५/५०७८,दि.०५/०२/२०२४ रोजीच्या पुणे महानगरपालिके कडील प्रारुप विकास योजना आराखडा सन २०१३ नुसार सदर मिळकत स्लम झोन मध्ये येत आहे. तसेच, महापालिका सहायक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचे दि.१७/०३/२०२० व उप आयुक्त, परीमंडळ क्र.५, पुणे महानगरपालिका यांचे दि.१९/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदरची मिळकत ही झोपडपट्टी सदृश्य असलेबाबतचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तसेच उपआयुक्त परिमंडळ क्र. ५, पुणे महानगरपालिका यांनी दि.२०/०९/२०२४ रोजी झोपडपट्टी सदृश्य अहवाल मा.आयुक्त,पुणे मनपा यांनी मान्यता दिल्याप्रमाणे फेरपडताळणी करुन या कार्यालयास सदर ठिकाणी झापेडपट्टी सदृश्य परिस्थिती असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्याची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑक्टोंबर १७-२३, २०२४ पृष्ठ मध्ये क्र. ३९-४१ तसेच दै.पुण्यनगरी व दै.विश्वदर्पण या वृत्तपत्रात दि.०८/१०/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजनाक्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त पूर्वसूचनेस आक्षेप/ हरकती/ सूचना/ दावे आणि पुरावे प्राप्त न झालेने उपरोक्त नमुद बाबी विचारात घेऊन, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) नुसार अधिसूचना**

**अनुसूची**

**झोपडपट्टीचे नाव** :- फा.प्लॉट क्र.४३०, प्लॉट क्र.४५, (स.नं.५४४/अ) गुलटेकडी, डायस प्लॉट, पुणे
**महानगरपालिका क्षेत्र** : पुणे

| नगर रचना | अंतिम भूखंड क्र. | पुर्वसूचने मध्ये नमुद क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णत: | वाढ / घट | अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुलटेकडी, डायस प्लॉट | फा.प्लॉट क्र.४३०, प्लॉट क्र.४५ (स.नं.५४४/अ) | ९८०.७६ चौ.मी. | - | ९८०.७६ चौ.मी. | खाजगी | **पुर्वेस** - लागु फा.प्लॉट क्र.४७२ डी व गावठाण | |
| | | | | | | **दक्षिणेस** - लागु फा.प्लॉट नं.४३० पै. फा.प्लॉट क्र.४६ | |
| | | | | | | **पश्चिमेस** – - रस्ता | |
| | | | | | | **उत्तरेस** - लागु फा.प्लॉट नं.४३० पै. फा.प्लॉट क्र.४४ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक** :- / /२०२४

नीलेश गटणे (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी**

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा, पुणे-०१ यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
३. विकसक मे. बुशरा कंन्सट्रक्शन शहानुर कॉप्लेक्स, शॉप क्र.३, ५१४ भवानी पेठ, पुणे-४११०४२.